# <u>भारतीय नौदल पोवाडा</u>

**आधी नमितो भारत माता । राष्ट्रदेवता । गातो गुण गाथा ।**
**वंदूनी भारतीय सैन्यास ।**
**मुजरा हा सकल रसिक जनास ।**
**गातो पोवाडा नौदल दिनास ॥ जी ॥**

**मुजरा मानाचा माझा... मुजरा मानाचा माझा...**
**मुजरा मानाचा शाहीराचा छत्रपती शिवबा चरणा...॥ जी ॥**

**असे होते आरमार सूर्य । दाविले शौर्य । वर्णावे कार्य ।**
**स्थापिले मराठा आरमार ।**
**केला स्वराज्य विस्तार ।**
**प्रणाम त्यांना वारंवार ।।जी।।**

**धन्य धन्य भारतीय सेना । पराक्रमी माना । अजिंक्य बाणा ।**
**देशाच्या रक्षणासाठी ।**
**नौदलसेना सज्ज राही ताठी ।**
**समुद्रावर ज्यांची व्याप्ती ।**
**घुमते नौदल सैन्याची कीर्ती ॥ जी ॥**

**जयजयकार भारतमातेचा । शूर शिवबाचा । भारतीय सैन्याचा ।**
**मनोमनी उषःकाल झाला ।**
**नौदल दिन चिरायू झाला ।**
**अभिमानाने गर्जला ।**
**भारत माता की जय बोला ॥ जी ॥**

**स्वातंत्र्याच्या रक्षणाला । या भारताच्या रक्षणाला ।**
**झाले तयार मावळे झाले तयार । जय हिंद जय भारत करती जयजयकार ॥जी॥**